**<u>अर्जदारांतर्फे उलटतपास– श्री. एन. जी. पोवार वकील.</u>**

**११.** माझे पदवी पर्यंतचे शिक्षण झालेले असून मी अद्याप अविवाहित आहे. अर्जदाराने लग्नामध्ये झालेल्या खर्चाच्या पावत्या दाखल केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराच्या लग्नातील संपुर्ण खर्च यादीमध्ये ठरल्याप्रमाणे करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी शपथपत्रात अर्जदाराच्या लग्नाचा संपुर्ण खर्च केल्याचे खोटे सांगत आहे.

**१२**. अर्जदाराचे लग्न ठरल्यापासून लग्न होईपर्यंत दोन महिन्याचा कालावधी होता. त्या दरम्यानच्या काळात अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ फोनवरती एकमेकांशी बोलत होते. आम्ही गैरअर्जदार क्र.१ बाबत मिळेल तेवढी माहिती मिळाल्यानंतर त्यांचे लग्न ठरविले होते. मी शपथपत्राच्या परिच्छेद क्र.३ मध्ये उल्लेख केलेल्या घटनांबाबत मला अर्जदाराने पुर्णपणे माहिती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेल्या घटना घडलेल्या नसल्यामुळे अर्जदाराने मला माहिती दिली नाही.

**१३**. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदार क्र.१ सैन्यदलात नोकरी लावण्याच्या आमिषाने पैसे लुबाडत असल्याचा खोटा आरोप केला आहे. मी गैरअर्जदार क्र.१ ने फसवणूक केल्याबाबत साक्षीदार तपासू शकतो. मी गैरअर्जदार क्र.१ ने फसवणूक केल्या बाबतच्या तक्रारीची कागदपत्रे दाखल करु शकत नाही. मला अर्जदाराने तिला गैरअर्जदार क्र.१ ने पंचगंगा नदीकिनारी नेऊन जिवे मारण्याची धमकी दिल्याची बाब सांगितली होती. मी अर्जदाराचा संसार सुरळीत चालावा या अपेक्षेने सदर घटने बाबत कोठेही तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्या प्रमाणे कोणतीही घटना घडलेली नसल्यामुळे त्याबाबतची तक्रार दिलेली नाही.

**१४.** मी सदर घटना केव्हा घडली तसेच मला अर्जदाराने त्याबाबत केव्हा सांगितले याबाबतचा मजकूर माझ्या शपथपत्रात नमूद केलेला नाही. मी माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.५ व ६ मध्ये उल्लेख केलेल्या घटनांबाबत अर्जदाराने मला सांगितले होते. मी त्याबाबत त्यांच्यामध्ये मध्यस्थी करण्याचा दोन वेळा प्रयत्न केला होता. मी त्याबाबतचा मजकूर माझ्या शपथपत्रात लिहिलेला नाही.

**१५**. मला अर्जदाराने लग्नानंतर जम्मू–काश्मीर येथे फिरायला गेल्यानंतर तिला झालेल्या

त्रासाबाबत सांगितले होते. मी त्याबाबत अर्जदाराचा संसार सुरळीत चालावा या अपेक्षेने तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.७ मध्ये खोटा मजकूर नमूद केलेला आहे.

**१६**. माझी आई आजरा तालुक्यातील प्रतिष्ठीत महिला असून कोल्हापूर जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समितीची अध्यक्षा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईची राजकीय ओळख आहे. माझी आई समाजकार्य करत असून अन्याय होत असल्याचा आवाज उठवते. आम्ही अर्जदाराच्या सुरळीत संसाराच्या आणि बदनामीच्या भीतीने गैरअर्जदारां विरोधात आजपर्यंत कोठेही तक्रार दिलेली नाही.

**१७**. मी आवश्यकता असल्यास अर्जदार व गैरअर्जदारांमध्ये तडजोड करण्यासाठी बोलावलेल्या मध्यस्थांची साक्ष नोंदवू शकतो. मी माझ्या शपथपत्रात कोणत्या मध्यस्थां मार्फत कोणत्या ठिकाणी व केव्हा बैठक घेतली याबाबतचा उल्लेख केलेला नाही. मी माझ्या शपथपत्रात मध्यस्थांची नावे नमूद केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही अर्जदाराचा संसार सुरळीत चालण्यासाठी मध्यस्थां मार्फत कोणतेही प्रयत्न केलेले नसल्यामुळे त्याबाबतचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही.

**१८**. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराला नांदावयास येण्याबाबत वकिलांमार्फत नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ ने कोल्हापूर महिला दक्षता समितीकडे अर्जदाराने नांदावयास येण्याबाबत अर्ज केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या प्रकरणामध्ये अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ चे पोलिसांनी जबाब नोंदविले होते. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार क्र.१ ने कोल्हापूर कौटुंबिक न्यायालयात आणि कोल्हापूर विधी प्राधिकरण यांच्याकडे अर्जदाराने नांदावयास येण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहेत.

**१९**. मी गैरअर्जदार क्र.१ च्या हॉटेल व्यवसायाची आणि स्थावर मिळकतींची कागदपत्रे मिळाल्यास दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र.१० मध्ये सांगितल्या प्रमाणे गैरअर्जदार क्र.१ चे कोणतेही हॉटेल्स नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईच्या सांगण्यावरुन अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ सोबत नांदण्यास नकार

देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदाराला मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक - ०२.०१.२०२५.

(आर. पी. थोरे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.